**सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई    दिनांक:-०५.०८.२०२५**

**सेवानिवृत्त गट-अ (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवा करार तत्त्वावर घेण्याबाबत...**

राज्य मुख्य सेवा हक्क आयोग कार्यालय,मुंबई या कार्यालयामध्ये निम्नलिखित विवक्षित कामकाजासाठी राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागातून/राज्य सेवा हक्क आयोगामधून गट-अ (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावयाची आहे:-

| |
|---|
| ➢ महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने सार्वजनिक प्राधिकरण/विभाग यांच्या सेवा देण्याच्या कामकाजाविषयी मूल्यमापन करणे व सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करणे. |
| ➢ आयोगाचा वार्षिक अहवाल तयार करण्याचा कामी सर्व प्रशासकीय विभागांशी समन्वय साधणे |
| ➢ आयोगाच्या प्रसिध्दी व प्रचार या विषयीच्या कामकाजामध्ये शासनमान्य जाहिरात संस्थेस आयोगाविषयी व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाविषयी आवश्यक ती माहिती पुरविणे व कामावर देखरेख ठेवणे. |

२. उपरोक्त विवक्षित कामासाठी राज्य शासनाच्या प्रशासकीय विभाग/क्षेत्रीय कार्यालयातील कामकाजाचा गट-अ च्या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याची सेवा करार पध्दतीने १ वर्षाकरिता घेण्यासाठी आवश्यक सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३) दिनांक १० जून, २०२५ मधील अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. वरील कामाकरिता इच्छुक सेवानिवृत्त गट-अ (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) संवर्गातील अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने प्रथमत: १ वर्षाकरिता घेण्यात येईल. उक्त शासन निर्णयाची प्रत शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०६१०१२५३३५९१०७ असा आहे.

वरील प्रमाणे करार पद्धतीने घेतल्या जाणाऱ्या सेवानिवृत्त गट अ (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवा कराराच्या अटी व शर्ती तसेच मासिक पारिश्रमिक भत्ते हे सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त शासन निर्णय दिनांक १०/०६/२०२५ मध्ये नमूद केल्यानुसार व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणांनुसार राहतील.

तरी इच्छुक उमेदवाराने त्यांच्या अर्जासहित बायोडाटा, कार्यासन-लोकशाही दिन कक्ष,सामान्य प्रशासन विभाग, ६ वा मजला (विस्तारीत इमारत),दालन क्र.६३१,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना दिनांक ०५/०९/२०२५ पर्यंत पोहोचतील अशा बेताने समक्ष अथवा

टपालाद्वारे अथवा ई-मेलने (rts.mumcomm-mh@mah.gov.in) सादर करावा. विहित दिनांकानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जाचा विहित नमुना सदर जाहिराती सोबत जोडला आहे.

(मनस्वी गोंधळी)
कक्ष अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग

# अर्ज करावयाचा नमुना

| अ.क्र. | गट-अ (वेतनस्तर एस-२५ किंवा अधिक) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी विवक्षित कामासाठी करार पध्दतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज | पासपोर्ट साईज फोटो |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे संपूर्ण नाव | |
| २ | पत्र व्यवहाराचा पत्ता व ई-मेल | |
| ३ | दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | जन्म दिनांक व दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ रोजी असलेले वय :- | |
| ५ | सेवानिवृत्तीचा दिनांक व सेवानिवृत्तीच्या वेळेस धारण केलेले पद | |
| ६ | प्रवर्ग | |
| ७ | सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या बँकेचे नाव,खाते क्रमांक | |
| ८ | शैक्षणिक अर्हता,बोर्ड/विद्यापीठाचे नाव,उत्तीर्ण वर्ष, टक्केवारी,श्रेणी याबाबतचा तपशिल | |
| ९ | संगणक व इतर अर्हता | |
| १० | शासकीय कामकाजाच्या अनुभवाचा तपशिल (राज्य सेवा हक्क आयोगाचे कामकाज असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.) | |
| ११ | प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहिती पैकी कोणतीही माहिती असत्य चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे. | |
| १२ | कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरूपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणाधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशिलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे. | |

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :-

स्थळ:-

- **वरील प्रमाणे नमूद सर्व कागदपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रति जोडणे आवश्यक.**